स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्या शाखेतील अर्थशास्त्र विषयाच्या पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला

शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषयाचे नांव

" भारतातील परकिय गुंतवणूकीचा अभ्यास "
(कालखंड २०१०-११ ते २०२१-२२)

संशोधक

सौ. सानप एम. के.

M.A, SET, B.Ed

आनंदनगर, पाथर्डी, जि अहमदनगर.

मो. नं.9403686291

Email Id- sanapmanisha2015@gmail.com

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. पाते एस. बी.

सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शन तथा अर्थशास्त्र विभागप्रमुख,

संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी

मो. नं.9420815552

Email Id- shivajibpate@gmail.com

संशोधन केंद्र

अर्थशास्त्र विभाग,

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे,

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

मार्च २०२२

भारतातील परकीय गुंतवणूकीचा अभ्यास

(कालखंड २०१०-२०११ ते२०२१-२०२२)

भारताने १९९१ मध्ये स्वीकारलेल्या उदारीकरण धोरणामुळे देशात परकीय तंत्रज्ञान व परकीय त्यक्ष गुंतवणूकीचा मार्ग मोकळा झाला. भारताची "वसुधैव कुटुंबकम" ही संस्कृतीच नाही तर 'निष्काम कर्म' या तत्वावर विश्वास देखील आहे. आज भारताची रत जगामध्ये सहावी मोठी अर्थव्यवस्था म्हणून नावारूपास येत आहे. जगभरात पसरलेला भारतीय समुदाय सर्वात मोठा सर्वाधिक गुणवत्ता क्षमता असलेला म्हणून आपल्या जनतेचे भौतिक कल्याण व जागतिक पुरवठा या साखळीशी जोडलेले आहे.

१९९१ पर्यंत भारताच्या चालू खात्यावर प्रचंड तुट होती. भारताचा व्यवहारतोल एकदम प्रतिकूल झाला होता. रुपयाचे अवमूल्यन, रुपयाची विनिमय दरात तीव्र घट आल्यामुळे ही परिस्थिती अधिक बिकट झाली होती. ती १९९०-१९९१ मध्ये ८.४% झाली. ती तुट भरून काढण्यासाठी कर्ज घ्यावी लागली. अंतर्गत कर्जही वाढली, परकीय चलनसाठा घटला त्यामुळे व्यापार तोलावर फार मोठे संकट आले. परकीय व्यापार, आयतशुल्क परकीय गुंतवणूकीबाबत भारतामध्ये खूप निर्बंध लावले होते. विकासदरही कमी होता. प्रचंड गरीबी, दारिद्र्य, विषमता, भांडवलाची कमतरता, उद्योग धंद्याचा अभाव, तुटीचा व्यापारतोल, परकीय चलनाचा तुटवडा, सार्वजनिक उपक्रमातील तोटा, देशावर विदेशी कर्जाचा डोंगर वाढत होता. चलनवाढ इ. अनेक समस्या भारतीय अर्थव्यवस्थेत निर्माण झाल्या होत्या या समस्येवरील उपपयोजना म्हणून

जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या त्रीसुत्री वर अधारित २४ जुलै १९९१ मध्ये पी. व्ही. नरसिंह राव व अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी हे धोरण स्वीकारले व परकीय गुंतवणूक धोरणात सुधारणा, गुंतवणूक सुविधा, व्यवसाय सुविधा या उपाययोजना केल्या. व भारताला खुल्या अर्थव्यवस्थेची दारे उघडी केली. त्याने भारताचा आर्थिक विकासदर वाढला. विकासाची गुरुकिल्ली म्हणून आपण या धोरणाला ओळखतो. भारताचा विकासदर वाढवण्यासाठी भांडवलाची गरज आहे. त्यासाठी परकीय गुंतवणूक महत्वाची भूमिका बजावते. परकीय गुंतवणूकीबरोबर तेथील तंत्रज्ञान, व्यवस्थापन, बौद्धिक भांडवल इ. देशात येते व देशाचा विकास होतो. हे अमेरिका या देशातील उदाहरणावरून लक्षात येते. भारतीय अर्थव्यवस्थेला आलेली मरगळ व आर्थिक घसरण थांबवण्यासाठी परकीय गुंतवणूक मोलाचा वाटा उचलणार आहे. २०२० मध्ये जगातील सर्वाधिक परकीय गुंतवणूक चीनमध्ये २१२ द. ल. डॉलर, अमेरिका – ११७ द. ल. डॉलर, भारत ६४ द. ल. डॉलर एवढी गुंतवणूक झाली आहे. कोविड महामारीमुळे जागतिक परकीय गुंतवणूक दर ३८% नी घसरला आहे. २०११ ते जून २०१८ या कालावधीत भारतातील परकीय गुंतवणूक अनुक्रमे १४९३९ द. ल. डॉलर,४२६२९ दशलक्ष डॉलर इतके होते. २०१८-१९ ते

२०२० मध्ये भारताची परकीय गुंतवणूक ३०७११ ते ३४१०९ द. ल. डॉलर पर्यंत पोहोचली. २०२०-२१ मध्ये परकीय गुंतवणूक सर्वाधिक ८१.७२ अब्ज डॉलर एवढी गुंतवणूक कोरोंना काळामध्ये झाली. हे भारतासाठी सकारात्मक पाऊल आहे.

२०१९-२० मध्ये या कालावधीत देशात ६७३८ कोटी ६७ लाख ६० हजार अमेरिकन डॉलर इतकी गुंतवणूक झाली. भारतात, सिंगापूर,USA, मॉरिशस, यूएई ई. देशांची गुंतवणूक वाढत आहे. त्यामुळे पूरक उद्योग, वाहन उद्योग, शेती, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, विमान सेवा, बांधकाम क्षेत्रामध्ये परकीय गुंतवणुकीमुळे विकास दर वाढला आहे.

२०१९-२० मध्ये देशात राज्यनिहाय सर्वाधिक परकीय गुंतवणूक केली. गुजरातमध्ये २४४८१.२५ द. ल. डॉलर (२९.६०%), महाराष्ट्र २३४३२.२९ द. ल. डॉलर (२७.९८%), कर्नाटक ११९५९.५ द. ल. डॉलर (१४.२७%) आहे.' आत्मनिर्भर भारत अभियान' हे जागतिक पातळीवर भारताचे स्थान अधिक दर्जेदार व स्पर्धाक्षम अर्थव्यवस्था म्हणून निर्माण होऊन भारतात परकीय गुंतवणूक करण्याचा विश्‍वास निर्माण होऊन विदेशी गुंतवणूकदार भारताकडे ओढले जातील. २०२० मध्ये ६४ अरब डॉलर इतकी परकीय गुंतवणूक झाली. २०१९ मध्ये ५१ अरब डॉलर होती. कोरोना सारख्या जागतिक महामारीत देखील भारतामधील गुंतवणूक वाढत आहे.

क्षेत्रनिहाय गुंतवणूक २०१०-११ ते २०१९ – २०२० अनुक्रमे उत्पादन क्षेत्र ४७९३ द. ल. डॉलर ते ८१५३ द. ल. डॉलर एवढी आहे. संदेशवहन क्षेत्रात १२२८ द. ल. डॉलर ते ६८३८ द. ल. डॉलर, किरकोळ बाजारात ४९१४द. ल. डॉलर व वाहतूक क्षेत्रात ३४४ द. ल. डॉलर वरुण ३६८४ द. ल. डॉलर परकीय गुंतवणूक झाली आहे. शिक्षण व संशोधन क्षेत्रात ५६ द. ल. डॉलर वरुण ५६४ द. ल. डॉलर एवढी परकीय गुंतवणूक वाढली आहे. सेवा क्षेत्रातही परकीय गुंतवणूक वाढत आहे.

भारताचे परकीयगुंतवणूकीसाठी सेवाक्षेत्र, हॉटेल, क्षेत्राची दारे खुली केली आहे. २०१४ ते १७ मध्ये १८% गुंतवणूक झाली. वित्त, व्यावसायिक केंद्र, तंत्रज्ञान, इ ना २४% ते १०० % पर्यंत गुंतवणुकीस मान्यता दिली आहे. २०११ मध्ये परकीय गुंतवणूक हा विषय किरकोळ व्यापार व व्यवसाय राजकीय व आर्थिक स्तरावर खूप गाजला होता. विमाक्षेत्रात १५ व्या घटनादुरुस्तीने लवचिकता निर्माण केली. व परकीय गुंतवणूक वाढलेली दिसते. रियल इस्टेट क्षेत्रात गुंतवणूक वाढली व हे क्षेत्र रोजगार उपलब्ध करून देणारे दुसऱ्या क्रमांकाचे महत्वाचे क्षेत्र आहे.

परकीय गुंतवणूकीचा अर्थ :-

"परकीय गुंतवणूक म्हणजे दोन विविध देशांतर्गत कंपन्यांना एकमेकांच्या देशात गुंतवणूक करण्याची मुभा होय."

भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन करण्याचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी परकीय गुंतवणूक हा मार्ग महत्वाचा राजमार्ग ठरणार आहे. निर्यातवाढ होऊन रोजगार वाढणार आहे तसेच व्यापारातील अर्थसंकल्पातील तूट कमी होऊन आर्थिक विकासदर वाढण्यास मदत होणार आहे. परकीय चलन वाढेल, व्यापारतूट कमी होईल, विकासदर वाढेल, रोजगार वाढेल. भारत आर्थिक महासत्तेकडे जात आहे.

'चेंज इज द ओनली कॉन्स्टन्ट इन द लाईफ' असं ग्रीक तत्वज्ञ हेराक्लिटस म्हटला आहे म्हणून भारताने या बदलाचा स्वीकार करून आर्थिक विकास साधावा.

- **संशोधन विषयाची निवड व महत्व** (Research Topic and Importance):-

१९९१ मध्ये भारतावरील कर्जाचा डोंगर वाढत आहे व परकीय चलनाचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे आर्थिक विकासदर घसरत आहे. त्याचाच परिणाम म्हणून बेरोजगारी वाढत आहे. भारतासारख्या 'युवकांचा देश' म्हणून ख्याति असणाऱ्या देशात बेरोजगारी हा ज्वलंत प्रश्न आहे. भारत देश पूर्वीपासूनच परकीय व्यापार करण्यामध्ये पुढे आहे. आर्य चाणक्य इ. स. पूर्व ३०० मध्ये अर्थशास्त्रात तसा उल्लेख आहे. व्यापारमधून आर्थिक विकास होतो हे साध्य झालेले आहे. म्हणून भारतातील विकासदर वाढण्यासाठी भांडवलाची गरज आहे.

'भारतातील परकीय गुंतवणूकीचा अभ्यास'

(कालखंड २०१०-११ ते २०२१-२२)

प्रचंड लोकसंख्या असलेल्या, रोजगार उपलब्ध करून, भाववाढ रोखणे, चलनघट, व्यापार तूट, अर्थसंकल्पीय तूट कमी करण्यासाठी परकीय गुंतवणुकीला अनन्यसाधारण महत्व आहे. कर्ज काढून विकास करण्यापेक्षा मुक्त अर्थव्यवस्थेचा अंगीकार केला तर तो विकास कायम शाश्वत राहिल म्हणून 'भारतातील परकीय गुंतवणूकीचा अभ्यास' (कालखंड २०१०-११ ते २०२१-२२) या अनुशंगाने सदरील विषंयाची निवड केली.

संशोधन समस्या :

भारताचा आर्थिक विकासदर घसरत आहे. भारताचा व्यापारतोल नेहमी ऋण असतो. भारताने खाजगीकरण धोरण १९९१ मध्ये स्वीकारले आहे. भारतातील परकीय गुंतवणूक १९६९ ते १९७५ मध्ये सुरू झाली. पण १९७५ ते १९९१ मध्ये विरोधावस्था होती. पण १९९१ च्या आर्थिक सुधारणे नंतर परकीय गुंतवणुकीला भारतामध्ये खऱ्या अर्थाने वेग आला. भारतातील प्रचंड बेरोजगारी, आर्थिक घसरता विकासदर, आर्थिक घसरण, उद्योगधंद्याचा अभाव, भांडवलाचा अभाव, प्रचंड भाववाढ या समस्या सोडवण्यासाठी परकीय भांडवल हा मार्ग चोखाळणे योग्य ठरणार आहे

कारण आर्थिक विकास होण्यासाठी व आर्थिक चक्र फिरण्यासाठी भांडवल आवश्यक आहे भांडवलाची गरज भागवणे, परकीय गुंतवणुकीतून शक्य होणार आहे. व यामधून भारताची महासत्तेकडे होणारी आगेकूच यथार्थ होणार आहे. अनेक प्रश्न भारतासमोर उभे आहेत. पायाभूत सुविधा, वेरोजगारी, चलनवाढ, उद्योगधंदे, आर्थिक तूट, इ. समस्या आहेत त्या कमी होतील म्हणून ही समस्या संशोधांनासाठी निवडली आहेत.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Research Objectives) :

१) भारताच्या परकीय गुंतवणूकीच्या प्रवृत्तीचा अभ्यास करणे.
२) भारतातील परकीय गुंतवणूकीच्या प्रकारानुसार अभ्यास करणे.
३) भारतातील परकीय गुंतवणूकीचा क्षेत्रनिहाय अभ्यास करणे.
४) भारतातील परकीय गुंतवणूकीचा राज्यनिहाय अभ्यास करणे.
५) भारतातील परकीय गुंतवणूकीत इतर देशांच्या सहभागाचा शोध घेणे.
६) भारतातील परकीय गुंतवणूक व भारताचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्न यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
७) भारतातील विदेशी गुंतवणूकीतील समस्यांचा शोध घेऊन त्यावर निष्कर्ष व शिफारशी सूचविणे.

- **संशोधनाची गृहीते (Hypothesis) :**

१) भारतातील परकीय गुंतवणूक वाढत आहे.
२) भारतातील परकीय गुंतवणूकीत राज्यनिहाय असमतोल आहे.
३) भारतातील परकीय गुंतवणूकीत प्रत्यक्ष गुंतवणूकीपेक्षा अप्रत्यक्ष गुंतवणूक जास्त आहे.
४) भारतातील परकीय गुंतवणूक विशिष्ट क्षेत्रातच केंद्रीत झाली आहे.
५) भारताच्या परकीय गुंतवणूकीत काही देशांचाच मोठा वाटा आहे.
६) भारतातील परकीय गुंतवणूकीमुळे भारताच्या विकासाला चालना मिळाली.

- **संशोधन पद्धती** :

भारतातील परकीय गुंतवणूकीचा अभ्यास' (कालखंड २०१०-११ ते २०२१-२२) या विषयावर संशोधन करण्यासाठी वर्गीकरणात्मक अर्थशास्त्रीय संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार असून तथ्य संकलनासाठी द्वितीयक सामग्री संग्रहण (Collection of Secondary Data) पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे. शासकीय अहवाल विविध समिती अहवाल संदर्भ ग्रंथ मासिके संशोधने इ. आधार घेऊन तथ्य संकलन करुन त्याचे तसेच तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, वार्षिक वृद्धीदर, निर्देशांक, आलेख, गरजेनुसार सांख्यिकीय साधनांचा वापर केला जाणार आहे.

- **संशोधन कालावधी, व्याप्ती व मर्यादा** :

'भारतातील परकीय गुंतवणूकीचा अभ्यास' या विषयावर संशोधन करण्यासाठी संशोधन कालावधी २०१०-११ ते २०२१-२०२२ असा घेतला असून सदरील संशोधन विषयाची व्याप्ती भारतातील परकीय गुंतवणूकी पूरती मर्यादित आहे.सदरील संशोधांनासाठी तथ्य संकलन द्वितीयक सामग्रीच्या सहाय्याने करण्यात येणार असून त्यासाठी वेबसाइट, इंटरनेट तसेच विविध शासकीय अहवालाची आकडेवारी घेतली जाणार आहे. त्यामध्ये काही प्रमाणात चुकीची शक्यता नाकारता येत नाही तसेच सदरील संशोधन हे केवळ भारतातील परकीय गुंतवणूकीचा अभ्यास केला आहे ही त्याची मर्यादा आहे.

- **प्रकरणाची रूपरेषा (Research Design)**

i) **प्रकरण पहिले :-** प्रस्तावना

ii) **प्रकरण दुसरे :-** भारताची अर्थव्यवस्था

iii) **प्रकरण तिसरे :-** संशोधन साहित्याच्या आढावा

iv) **प्रकरण चौथे :-** भारतातील परकीय गुंतवणुकीची प्रवृत्ती

v) **प्रकरण पाचवे :-** भारतातील परकीय गुंतवणुकीची क्षेत्रनिहाय प्रवृत्ती

vi) **प्रकरण सहावे :-** भारतातील परकीय गुंतवणुकीची राज्यनिहाय प्रवृत्ती

vii) **प्रकरण सातवे :-** निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ :

१) 'आगलावे प्रदीप' सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र पृष्ठ क्र. १७२

२) 'कऱ्हाडे बी. एम., "शास्त्रीय संशोधन पद्धती", पिंपळापुरे अँड कंपनी प्रकाशन

३) योजना २०१४ मासिक 'भारतातील परकीय गुंतवणूक'

४) I KhandagalePratibha "A study of foreign direct investment in Maharashtra 1991 – 2003" Shivaji University 2006.

५) Baig, Sarvar Foreign direct Investment in India a comparative study ofpre form and post reform periods BAMU, University 2005.

६) MadaanRachna 'FDI in flows in India trend determinants and Implications for development. Ansal University 2016.

७) Grove Gagan "Foreign direct Investment in India Challenges and prospect with special Reference to retal sector." Bharti Vidyapeeth Deemed University, 2015.

८) BangaRashmi (2004) Impact of Japanese and US FDI on productivity Growth A firm – Level Analysis economic and political weekly. Vol. 39 5 Jan 2004.

९) Jugale V. B. 'Economy of Maharashtra Problems and prospects, Shivaji University, Kolhapur (2003).
१०) एम. गजेंद्र (जानेवारी २०१०) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र सक्सेस पब्लिकेशन पान नं. १०.१ ते १०.६.
११) दत्त सुंदरम (२००९) भारतीय अर्थव्यवस्था पान नं. २९४
१२) J. Khandagale P. "A study of foreign direct Investment in Maharashtra 1991-2003".
१३) नियतकालिके
१४) वर्तमानपत्र
१५) शोधप्रबंध
१६) इंटरनेट इ.

विद्यार्थ्याची सही	मार्गदर्शकाची सही
सानप मनिषा किसन	डॉ. पाते एस. बी.